तेजस ड्राय क्लीनर्स
मोफत घरपोहोच सेवा
साईनाथ मोरे
9623562694
8626057002
साडी रोलप्रेस, स्ट्रीम प्रेस, कपडे ड्रायक्लिन व इस्तरी करून मिळतील.
मिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड पवन नगर महाल जवळ कजबे वस्ती, अहिल्यानगर ४१४००३
मोबाईल -९६२३५६२६९४

दैनिक
आकर्षण
संपादक : विजय सांगळे

गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चंटस को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.

वर्ष ६ । अंक ३७ । गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

भाजप नगरसेवक सागर मुर्तडकरची सिव्हीलमध्ये शाही बडदास्त

शिवसेनेचे सचिन जाधव यांच्या ‘स्टिंग ऑपरेशन’ने दाखवली सबजेलची हवा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– तरुण व्यावसायिक रोहित पाथरकर यांच्यावरील जीवघेण्या हल्ला प्रकरणात मुख्य आरोपी असलेला भाजप नगरसेवक सागर मुर्तडकर याने न्यायालयीन कोठडी टाळण्यासाठी प्रकृतीचे कारण देत सिव्हील हॉस्पिटलमध्ये आश्रय घेतला होता. तेथे त्याची पोलिसांच्या उपस्थितीत शाही बडदास्त सुरू होती. मात्र, माजी नगरसेवक सचिन जाधव यांनी थेट स्टिंग ऑपरेशन करून या प्रकाराचा पर्दाफाश केल्यानंतर मुर्तडकरला तातडीने सबजेलची हवा दाखविण्यात आली.

नेमके काय घडले?

गेल्या महिन्यात नगर-पुणे रोडवर व्यावसायिक रोहित पाथरकर यांना झालेल्या बेदम मारहाण प्रकरणात सागर मुर्तडकरचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालय आणि औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला होता. त्यानंतर तो पोलिसांना शरण आला व न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी संपल्यानंतर मुर्तडकरची रवानगी न्यायालयीन कोठडीत होणार होती. परंतु,न्यायालयीन कोठडीत जावे लागताच त्याने लगेच प्रकृती अस्वास्थ्याचे कारण सांगितले आणि तो सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. हॉस्पिटलमध्ये त्याच्याभोवती गुंडपुंड कार्यकर्त्यांचा राबता सुरू झाला आणि पोलिसांच्या उपस्थितीतच त्याची शाही बडदास्त ठेवली जात असल्याचे समोर आले.

सचिन जाधवांचे स्टिंग ऑपरेशन आणि इशारा

या प्रकाराची कुणकूण लागताच माजी नगरसेवक सचिन जाधव यांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये जाऊन स्टिंग ऑपरेशन केले. कॉटवर आरामात झोपून मुर्तडकर मोबाईल बघत असल्याचा तसेच त्याच्या भोवती गुंडपुंडांचा गराडा असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. जाधव यांनी मुर्तडकरच्या शाही बडदास्तीचे फोटो आणि व्हिडिओ थेट पोलीस अधीक्षकांना पाठवून त्यांचे या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले. एवढेच नाही तर, जाधव यांनी सिव्हीलच्या महिला वैद्यकीय अधिकारी (आरएमओ) यांच्याशी संपर्क साधून तीव्र नाराजी व्यक्त केली. हा प्रकार तातडीने थांबला नाही, तर महिला शिवसेना कार्यकर्त्यांच्या वतीने आरएमओ मॅडमला काळे फासण्यात येईल,असा थेट इशाराच त्यांनी दिला. सचिन जाधव यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर आणि पुराव्यांसह केलेल्या तक्रारीनंतर पोलीस व वैद्यकीय प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. तातडीने सूत्रे हलली आणि सागर मुर्तडकरला सिव्हील हॉस्पिटलमधून हलवून थेट सबजेलमध्ये पाठवण्यात आले.

तोफखाना पोलिसांनी उघडकीस आणलेल्या ड्रग्ज प्रकरणातील २३ आरोपींचे जामीन फेटाळले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नशामुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत तोफखाना पोलिसांनी उघडकीस आणलेल्या ३६ लाख ३९ हजार रुपयांच्या एमडी (मॅफेड्रॉन) ड्रग्ज तस्करी प्रकरणातील २३ आरोपींचे जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केले आहेत. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या विशेष तपास पथकाने न्यायालयात सबळ पुराव्यांसह भक्कम कायदेशीर बाजू मांडल्याने आरोपींना हा दणका बसला आहे. या प्रकरणात एकूण ५६ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी ३३ आरोपी अद्याप फरार आहेत. ■ पान ४ वर

जामीन फेटाळलेले २३ आरोपी (सध्या कोठडीत)

१. जिशान शौकत सय्यद (वय २६, रा. मुकुंदनगर, सहारा कॉलनी) २. रिहान जावेद शेख (वय २६, रा. छोटी मरीयम मशिदीजवळ, मुकुंदनगर) ३. वसिम खलिल बागवान (वय ३८, रा. पिंजार गल्ली) ४. जमीर निसार शेख (वय ३७, रा. छोटी मरीयम मशिदीजवळ, मुकुंदनगर) ५. दानीश फारुक शेख (वय २९, रा. जुनी घासगल्ली, तांबटकर गल्ली) ६. अलीरजा शकील शेख (वय १९, रा. पोलीस चौकी जवळ, गोविंदपूरा, मुकुंदनगर) ■ पान ४ वर

हवे असलेले ३३ फरार आरोपी

१. उफेर उर्फ लाला राजमहंमद शेख (रा. मुकुंदनगर) २. अशियान आवेज शेख (रा. आयेशा मशिदीजवळ, मुकुंदनगर) ३. आयान उर्फ गोल्या नईम शेख (रा. आलमगीर, अहिल्यानगर) ४. जहिर ऊर्फ जज्ञा नवाज शेख (रा. शेवगांव) ५. नाजिश उर्फ नन्नु साजीद सय्यद (रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर) ६. रमजु उर्फ रमिझ चुन्नु जाऊश (रा. पुणे - पुर्ण नांव व पत्ता माहित नाही) ७. अरमान उर्फ सोनु शेख (रा. मुल्ला कॉलनी, मुकुंदनगर) ८. सैफउल्ला उर्फ उल्ला मुनाफ बागवान ■ पान ४ वर

५० लाख द्या, अन्यथा एमपीडीए, मोक्का लावून जेलमध्ये टाकू!

पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांच्यासह अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर सरपंच शरद पवार यांचे गंभीर प्रश्न; जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे चौकशीची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– ‘५० लाख रुपये द्या, अन्यथा एमपीडीए किंवा मोक्का लावून ५ वर्षे तुरुंगात डांबू’,अशी धमकी दिली जात असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष तथा सरपंच शरद खंडू पवार यांनी केला आहे. अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांच्यासह संबंधित तालुका पोलीस स्टेशनचे व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. पोलिसांकडूनच अशा प्रकारे दबाव आणला जात असल्याचा आरोप झाल्याने नगर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

शरद पवार यांनी २२ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात, आपण मागील १२ वर्षांपासून राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असून, राजकीय विरोधातून आपल्याला लक्ष्य केले जात असल्याचा दावा केला आहे. चिंचोडी पाटील परिसरात सरपंच व अहिल्यानगर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा तालुकाध्यक्ष म्हणून खासदार निलेश लंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना आपल्याला अडचणीत आणण्याचे प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

यापूर्वी नगर तालुका पोलीस स्टेशन राजकीय सत्ताधाऱ्यांच्या दबावापोटी गंभीर स्वरूपाचे खोटे बनावट गुन्हे दाखल केले,बेकायदेशीर जिल्हा बंदी केली, बनावट अतिक्रमण दाखवून सरपंच पद रद्द केले, व आता थेट एम पी डी ए व मोक्का लावण्याची प्रोसेस सुरू केली.

या सर्व प्रकरणात मी निर्दोष आहे. मागील ४ मे रोजी दाखल झालेल्या खोट्या गुन्ह्यात माननीय उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेशात म्हटलेले आहे सदर गुन्हा खोटा व बनावट आहे व मा.प्रांत साहेब यांनी माझी जिल्हा बंदी फेटाळलेली आहे, मा.उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी व ग्रामपंचायत विभागीय आयुक्त यांच्या कारवाईवर माननीय उच्च न्यायालय यांनी माझे सरपंच पद कायम ठेवलेले होते.व खोट्या गुन्ह्याचे अनेक पुरावे असूनही माननीय उच्च न्यायालय यांनी स्पष्ट म्हटलेले आहे सदर गुन्हा खोटा आहे तरीही पोलिसांना ५० लाख रुपये दिले नाही म्हणून व खासदार निलेश लंके साहेबांना या गुन्ह्यात गुंतवले नाही म्हणून माझ्यावर खोट्या व बनावट राजकीय दबावापोटी गंभीर स्वरूपाच्या एम पी डी ए मोक्का सारख्या कारवाया होत आहेत.

५० लाख रुपयांची कथित मागणी नेमकी कोणी केली, त्यामागे कोणाचा दबाव होता आणि एमपीडीएच्या कारवाईची धमकी देण्यामागील कारण काय, या मुद्द्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

यापूर्वीही सरपंच शरद पवार यांना ताब्यात घेण्यासाठी मोठा पोलिसांचा फौज फाटा चिचोंडी पाटील येथे गेला होता तेव्हा ए पी आय प्रल्हाद गीते साहेब यांच्याशी ग्रामस्थांचे कार्यकर्त्यांचे वाद होऊन पोलिसांनी खंडणी मागितल्याचा आरोप पवार यांनी केला होता.

‘खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याचा प्रयत्न’

आपल्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करून राजकीय व सामाजिक जीवनातून बाजूला करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय सरपंच तालुकाध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. या कथित प्रकारामुळे आपल्यासह कुटुंबीयांना सहकाऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. यापूर्वीही वरिष्ठ पातळीवर तक्रारी केल्याचा दावा करत, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या कामकाजाची तपासणी करावी आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन झाले आहे की नाही, याची पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नगर तालुक्यातील अवैध धंद्यांविरोधात आवाज उठविणार असल्याचे व हफ्तेखोर पोलिसांवर कारवाईची मागणी करतात, आपल्याला किंवा कुटुंबीयांना नाहक त्रास दिल्यास त्याची जबाबदारी निश्चित करावी, असेही त्यांनी म्हटले आहे. याशिवाय, आपला आणि मित्रांचा मोबाईल तसेच वाहन मिळण्यासाठी ■ पान ४ वर

दुष्काळी परिस्थितीत कर्जवसुलीला स्थगिती द्या!

अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ; अनधिकृत वसुली एजंटांवर कारवाईची मागणी । गुन्हेगारी प्रवृत्तीच्या वसुली एजंटांवर कारवाईसाठी सह्याद्री छावाचा एल्गार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांकडून करण्यात येणाऱ्या कर्जवसुलीला स्थगिती द्यावी, तसेच कर्जवसुलीच्या नावाखाली नागरिकांना धमकावणे, दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून पैसे वसूल करण्याच्या कथित प्रकारांना आळा घालावा, या मागण्यांसाठी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात आले. पारंपरिक जागरण-गोंधळाच्या माध्यमातून आंदोलकांनी कर्जवसुलीच्या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधत जोरदार निदर्शने केली.

या आंदोलनात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, छावा संघटना भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, स्वराज्य पक्षाचे जिल्हाप्रमुख योगेश शेंडगे, जनार्दन कंद, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, आबा राठोड, किसन शिरडकर, मच्छिंद्र पाटोळे, साहेबराव पाटोळे, दत्ता वामन, ज्योती माळी, मुक्ता शेडाळे, अभिषेक घोडके, रामदास मोढवे, विजया पवार, मालनबाई गरड, संगीता वाल्हेकर, एकनाथ दातीर, महादेव खामकर, विष्णू जरे, भानुदास ससे, बाळासाहेब फाटके आदी सहभागी झाले होते.

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांवरील ताण अधिक वाढू शकतो. त्यामुळे परिस्थितीचा विचार करून कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत शासन व प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली.

फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी काही ठिकाणी अनधिकृत एजंटांची नियुक्ती केली जात असून, त्यांच्यामार्फत नागरिकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. वसुलीच्या नावाखाली दहशत निर्माण करणे, वाहनचालकांना रस्त्यात अडवणे, कागदपत्रांची मागणी करणे आणि पैशांसाठी धमकावणे, असे प्रकार घडत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

काही व्यक्तींकडून पैसे देण्यास नकार देणाऱ्या नागरिकांना मारहाण केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अशा कथित प्रकारांना विरोध करणाऱ्या स्थानिक नागरिकांना शिवीगाळ केली जात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली कायदा हातात घेण्याचे प्रकार घडत असतील, तर त्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

शहरातील विविध चौकांमध्ये वसुली एजंटांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर चौकटीतच पार पडली पाहिजे. कोणत्याही नागरिकाला धमकावणे, अपमानित करणे किंवा शारीरिक बळाचा वापर करून पैसे वसूल करणे, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी भूमिका संघटनेने मांडली.

कर्जवसुली करणाऱ्या एजंटांची नियुक्ती करताना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) लागू निर्देशांचे पालन करण्यात यावे. संबंधित व्यक्तींची पार्श्वभूमी तपासून आवश्यक पोलीस पडताळणी केल्यानंतरच त्यांना वसुलीचे काम देण्यात यावे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा अशा कामासाठी वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.फायनान्स कंपन्यांमधील काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांची खासगी माहिती बाहेरील व्यक्तींना पुरवली जात असल्याचाही आरोप संघटनेने केला. या माहितीचा गैरवापर करून काही व्यक्ती वाहनचालकांना अडवतात आणि त्यांच्याकडून पैशांची मागणी करतात, असे निवेदनात म्हटले आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी करून संबंधित कंपन्यांच्या वसुली प्रक्रियेची तपासणी करावी. ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करावे आणि नियमबाह्य कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत निर्णय घ्यावा, अनधिकृत वसुली एजंटांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे, नागरिकांना धमकावणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करावी, तसेच कर्जवसुलीच्या प्रक्रियेवर प्रशासनाने लक्ष ठेवावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या.

फिर्यादीच निघाला गुन्ह्याचा मास्टरमाईंड!

पारनेर पोलिसांकडून १२ तासांत पर्दाफाश, तिघांना अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– कोंबड्या विकून आलेले लाखो रुपये लुटल्याचा बनाव रचणारा फिर्यादीच या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात उघड झाले आहे. पारनेर पोलिसांनी अत्यंत वेगाने तपासाची चक्रे फिरवत अवघ्या १२ तासांत या गुन्ह्याची उकल केली असून, १३ लाख ६१ हजार रुपयांच्या मुद्देमालासह तिघांना बेड्या ठोकल्या आहेत.

दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ४ वाजता मांडवे (ता. पारनेर) घाटात हा प्रकार घडला. फिर्यादी मजहर खुदाबक्ष शेख (वय ३२, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) याने आपली पिकअप गाडी एका कारने अडवून, अज्ञात इसमांनी कोयत्याचा धाक दाखवत ३ लाख ४१ हजार रुपये आणि मोबाईल लुटल्याची तक्रार पारनेर पोलिसांत दिली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे ■ पान ४ वर

संगमनेरमध्ये कत्तलीसाठी डांबलेल्या २५ गोवंशीय जनावरांची सुटका

एलसीबीच्या कारवाईत सव्वापाच लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– संगमनेर शहरातील जमजम कॉलनी परिसरात कत्तलीच्या उद्देशाने निर्दयपणे डांबून ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने सुटका केली आहे. या कारवाईत ५ लाख ३० हजार रुपये किमतीची जनावरे जप्त करण्यात आली असून, पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. तर तीन आरोपी फरार झाले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार २८ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहर हद्दीत गस्त घालत होते. यावेळी पथकास गुप्त माहिती मिळाली की, लाला कुरेशी, जहीर कुरेशी आणि शमसू कुरेशी यांनी जमजम कॉलनी परिसरातील मोना प्लॉट येथे पाण्याच्या टाकीजवळ गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवली आहेत. पोलिसांनी छापा टाकला असता, ■ पान ४ वर

दै. आकर्षण निवडक

एस.पी. बालसुब्रह्मण्यम यांच्या अजरामर गीतांची रंगणार मैफल

अहिल्यानगर - भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि लोकप्रिय पार्श्वगायक स्वर्गीय एस.पी. बालसुब्रह्मण्यम यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा अनुभवण्याची संधी अहिल्यानगरकर रसिकांना मिळणार आहे. '९० टॉकीज' आणि ऑरेंज इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि.२९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६-३० वाजल्या पासून मिस मॅनेजिंग एस.पी. हीटस् ऑफ एस.पी.बालासुब्रमण्यम' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
हा कार्यक्रम नगर-मनमाड रोडवरील माऊली सभागृह अहिल्यानगर येथे होणार आहे. एस. पी. बालसुब्रह्मण्यम यांनी आपल्या सुरेल आवाजातून हिंदी चित्रपटसृष्टीला अनेक अजरामर गीते दिली. त्यांच्या लोकप्रिय गीतांच्या आठवणींना उजाळा देत संगीतप्रेमींना जुन्या हिंदी गीतांचा आनंद घेता यावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा एक भव्य कराओके ट्रॅक शो असून रसिकांना जुन्या हिंदी चित्रपटगीतांचा आनंद प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमात गायिका राधिका आत्रे, डॉ.दीपा मोहोळे, डॉ.सत्तार सय्यद,ॲड.सचिन चंदनशिव आणि जालिंदर शिंदे हे गायक सादरीकरण करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन डॉ.राजीव सूर्यवंशी करणार आहेत.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ दमन काशीद, डॉ गायत्री कुलकर्णी, डॉ मोहोळे, प्राध्यापक रवींद्र काळे, ॲड धनंजय वाघ यांनी सहकार्य केले आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांना प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. अहिल्यानगर मधील संगीतप्रेमींनी या सुरेल मैफलीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

वृक्षतोडीविरोधात अहिल्यानगरमध्ये 'भीमाशंकर सत्याग्रह' जारी

अहिल्यानगर- भीमाशंकर-कर्जत परिसरातील जंगलांचे संरक्षण करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने 'भीमाशंकर सत्याग्रह' या राज्यव्यापी अहिंसक अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. जागतिक तापमानवाढ, संभाव्य एल निनोचा प्रभाव, पाणीटंचाई आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक जंगलांचे संरक्षण हा केवळ स्थानिक प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी संबंधित विषय असल्याची भूमिका संघटनांनी मांडली आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या वनसंरक्षणाच्या लढ्याला महाराष्ट्रभरातील नागरिकांच्या सहभागाची जोड देण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवरच्या ३ हजार मेगावॅट क्षमतेच्या सायडोंगर१ पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन वळविण्याच्या आणि ३२ हजार ४९० झाडे तोडण्याच्या परवानगीबाबत वृत्ते प्रसिद्ध झाली आहेत. या वृक्षतोडीच्या मंजुरीमुळे परिसरातील वनसंपत्ती, जैवविविधता आणि जलस्रोतांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. मात्र, वृक्षतोडीसाठी मंजूर झालेली झाडांची संख्या आणि प्रत्यक्षात तोडण्यात आलेल्या झाडांची संख्या यांत फरक असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केल्यानंतर वृक्षतोड थांबविण्यात आल्याची वृत्ते समोर आली असली, तरी ही स्थगिती नेमकी किती काळासाठी आहे आणि भविष्यात वृक्षतोड पुन्हा सुरू होणार आहे का, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.त्यामुळे वृक्षतोड थांबविण्याबाबतचा लेखी आदेश, त्याची व्याप्ती, लागू अटी आणि पुढील कार्यवाही यांची माहिती शासनाने तातडीने सार्वजनिक करावी, अशी मागणी 'भीमाशंकर सत्याग्रहा'च्या माध्यमातून करण्यात आली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावित प्रकल्प भीमाशंकर अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असून अभयारण्य आणि त्याच्या अधिसूचित पर्यावरणसंवेदनशील क्षेत्राबाहेर आहे.

दुर्गादेवी अमरचंद नय्यर विद्या मंदिरचे क्रीडा स्पर्धेत यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रीडा स्पर्धेत नय्यर प्राथमिक विद्या मंदिरच्या खेळाडूंनी उत्तम यश प्राप्त केले. यशस्वी खेळाडूंचे बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष व नगरसेवक बाळासाहेब पवार, संचालक भास्करराव गोरे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ मोटे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार, लक्ष्मण माने, संतोष नागरगोजे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब नय्यर यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

मुलींच्या १४ वर्षे वयोगटातील खो-खो स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावत हा संघ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाला.

आट्यापाट्या स्पर्धेत १६ वर्षे मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळ करत प्रथम क्रमांक मिळवून विभागीय पातळीसाठी या संघाची निवड झाली, तर १४ वर्षे मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला, बेसबॉल स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला, तर १४ वर्षे मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. सॉफ्टबॉल स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या संघाने चांगली कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला.

शालेय क्रीडा प्रकारात लांब उडी स्पर्धेमध्ये गर्जे पल्लवी कानिफनाथ हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला व तिची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली. आजबे समृद्धी गणेश व साईराज बाबासाहेब वारे यांनी तृतीय क्रमांक मिळवला, तर कराटे स्पर्धेमध्ये दहिफळे कीर्ती आजिनाथ हिने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवून विभागीय पातळीवर खेळण्यासाठी तिची निवड झाली. दारकुंडे आदिती अजिनाथ हिने तृतीय क्रमांक मिळवला व वामन अभिमन्यू कालिदास यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. स्कवेश स्पर्धेत बेस्ट फाईव्हमध्ये दहिफळे कीर्ती आजिनाथ हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला व तिची विभागीय पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली आहे, तर आजबे समृद्धी गणेश हिने पाचवा क्रमांक मिळवत बेस्ट फाईव्ह मध्ये येण्याचा मान मिळवला.

या यशस्वी खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब नय्यर, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. सर्व खेळाडूंना मुख्याध्यापक एकनाथ मोटे, लक्ष्मण माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

मानव आणि समाजाने निश्चित केलेले उद्दिष्ट जगात सर्वश्रेष्ठ - समाजभूषण खंबाळकर

वर्षावास समारोहात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– छत्रपती संभाजीनगर रोड येथील चेतना लॉन्स येथे वर्षावास समारोह २०२६ (रौप्यमहोत्सवी वर्ष) धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी धम्मोपदेश करताना समाजभूषण (महाराष्ट्र शासन) काकासाहेब खंबाळकर यांनी मानव आणि समाजाने आपल्या जीवनाचे उद्दिष्ट निश्चित करणे हे सर्वांत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.

धार्मिक कार्यक्रमात भंते धम्मपाल व भिक्खुसंघ यांच्या उपस्थितीत त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. उपासक एम. बी. साळवे, कल्पना कांबळे, साधना घोडके, दीपा चव्हाण आणि विद्या जाधव यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन केले, तर भाऊसाहेब देठे यांनी ग्रंथाचे विश्लेषण केले. यावेळी मार्गदर्शन करताना काकासाहेब खंबाळकर म्हणाले की, धम्मामध्ये मानवाला सर्वोच्च स्थान आहे. व्यक्ती असो वा समाज, आपल्याला नेमके काय साध्य करायचे आहे, हे निश्चित केल्याशिवाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करता येत नाही. जगातील प्रत्येक व्यक्ती आणि समाजाने सर्वप्रथम आपले उद्दिष्ट ठरवणे आवश्यक आहे. उद्दिष्ट निश्चित नसेल, तर अपेक्षित कार्याची दिशा ठरत नाही आणि प्रगतीही साधता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

या समारोहात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र शासनाचा सन २०२१-२२ चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त समाजभूषण परिमल ज. निकम यांना काकासाहेब खंबाळकर यांच्या हस्ते गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते व बौद्धाचार्य अगस्ती पुनाजी बनसोडे सर यांना सामाजिक जाणिवेतून केलेल्या भरीव आणि कृतिशील कार्याबद्दल गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

वर्षावासाच्या कालावधीत दररोज नियमितपणे ग्रंथवाचन करण्याची परंपरा २५ वर्षांपासून जपल्याबद्दल प्रतिभा भाऊसाहेब देठे यांना 'ग्रंथवाचन सन्मानपत्र' प्रदान करण्यात आले. तसेच बापूसाहेब गायकवाड यांनी सन २०२५ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय पोलीस सेवेत (आयपीएस) यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमांत उपासिका आणि बाल उपासकांनी भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनावर आधारित नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. धार्मिक विचार, सामाजिक बांधिलकी, ग्रंथवाचनाची परंपरा आणि गुणवंतांचा सन्मान अशा विविध उपक्रमांनी वर्षावास समारोह उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

साखर कामगारांचा बेमुदत संप तात्पुरता स्थगित!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर–महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ यांच्या वतीने २२ ऑक्टोबर २०२६ पासून पुकारण्यात आलेला साखर कामगारांचा बेमुदत संप तात्पुरता स्थगित करण्यात आला आहे. मंगळवारी (दि. २७ ऑक्टोबर) मंत्रालय, मुंबई येथे राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत साखर कामगारांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. मागण्यांबाबत सकारात्मक तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सहकार व कामगार विभागाची संयुक्त बैठक आयोजित करण्याची विनंती करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी संप तात्पुरता स्थगित करण्यास सहमती दर्शविली, अशी माहिती महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब

काळे यांनी दिली.
या बैठकीस आमदार विनयराव कोरे, साखर कारखाना संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, कामगार विभागाचे अधिकारी तसेच दोन्ही कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याने पुढील बैठकीत त्यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत.
साखर उद्योगातील कामगारांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ, अहिल्यानगर आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ, पुणे यांनी निवेदन सादर केले होते. या मागण्यांच्या अनुषंगाने २२ ऑक्टोबरपासून बेमुदत संप पुकारण्यात आला होता.

आय.एम.एस.सी.डी.आर.च्या पहिल्या महिला संचालक म्हणून डॉ. प्रणोती तेलोरे यांच्याकडे पदभार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च) (आयएमएससीडीआर) या संस्थेची स्थापना १९९१ मध्ये झाली असून, व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात संस्थेने गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय योगदान दिले आहे. संस्थेला विविध राष्ट्रीय व प्रादेशिक पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, संस्थेला राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक), बेंगळुरू यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

आय.एम.एस.सी.डी.आर.च्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रणोती तेलोरे यांनी १ जुलै २०२६ रोजी तात्पुरता पदभार स्वीकारला होता. त्यानंतर १४ जुलै २०२६ रोजी त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. या निमित्ताने त्यांनी नुकताच आपल्या नवीन कार्यालयात प्रवेश केला. यावेळी छोटेखानी प्रार्थना आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर उपस्थितांना अल्पोपाहार देण्यात आला. रेव्हरंड फिलिप अब्राहम यांनी प्रार्थना केली.

डॉ. प्रणोती तेलोरे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात कॉर्पोरेट क्षेत्रातून केली. मात्र, अध्यापनाची आवड त्यांना आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये घेऊन आली. गेल्या २५ वर्षांपासून त्या संस्थेशी संलग्न असून, त्यांनी सुरुवातीला एमसीए विभागात आणि त्यानंतर एमबीए विभागात प्राध्यापक म्हणून काम केले. गेल्या तीन वर्षांपासून त्या व्यवस्थापन विभागप्रमुख म्हणून कार्यरत होत्या. विहित निवड प्रक्रिया आणि सखोल मुलाखत प्रक्रियेनंतर त्यांच्याकडे प्रभारी संचालकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संस्थेच्या इतिहासात प्रभारी संचालकपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या

आहेत.

बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी डॉ. प्रणोती तेलोरे यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले. त्यांच्या अनुभवाचा, समर्पित वृत्तीचा आणि नेतृत्वगुणांचा संस्थेच्या प्रगतीसाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वतोपरी सहकार्य आणि प्रोत्साहन देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

नवीन जिल्हाधिकारी कार्यालय रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन!

आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांना यश; जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती संभाजी महामार्ग ते माऊली संकुलमार्गे मनमाड महामार्गाला जोडणाऱ्या या रस्त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. या रस्त्याच्या विकासामुळे परिसराला सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होण्याबरोबरच नागरिकांना अधिक चांगल्या वाहतूक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गीतांजली काळे, प्रा. माणिकराव विधाते, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, विजय गव्हाळे, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, सुजाता पडोळे, सुनीता भिंगारदिवे, हरप्रीतकौर गंभीर, करण कराळे, महेश लोंढे, मोहित पंजाबी, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, रोहन सानप, सोमनाथ जाधव, सुमित लोंढे आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराच्या पुढील २० वर्षांचा विचार करून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सावेडी उपनगरातील तारकपूर, गुलमोहर रोड आणि पाईपलाईन रोडसह पर्यायी डीपी रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. नवीन जिल्हाधिकारी कार्यालय हे संपूर्ण जिल्ह्याच्या प्रशासकीय कामकाजाचे महत्त्वाचे केंद्र आहे. जिल्हाभरातून नागरिक विविध कामांसाठी येथे येत असतात. त्यामुळे या परिसरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविणे आवश्यक होते. छत्रपती संभाजी महामार्ग ते माऊली संकुलमार्गे मनमाड महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या विकासामुळे नागरिकांची वाहतुकीची गैरसोय दूर होण्यास मदत होईल.

शहरातील कॉलनी रस्त्यांपासून थेट डीपी रस्त्यांपर्यंतची बहुतांश विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. राज्याचे मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणी विविध बैठकांसाठी येत असतात. नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत भव्य असून, त्या इमारतीला साजेसा रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या कामामुळे परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि विकसित होण्यास मदत होईल. अशा पायाभूत सुविधांमधून शहराची प्रतिमा निर्माण होत असते, असे आमदार जगताप यांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी मोठा निधी प्राप्त झाला होता. त्याच निधीच्या माध्यमातून हे काम सुरू आहे. रस्ता म्हणजे केवळ दळणवळणाचे साधन नसून रोजगारनिर्मितीचेही महत्त्वाचे केंद्र आहे. रस्त्यांच्या विकासामुळे अनेक तरुणांच्या हाताला काम मिळते, व्यापारीकरण वाढते आणि विविध व्यवसायांना चालना मिळते, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून मार्गी लागत आहे. या कामामुळे परिसराला स्वच्छ आणि सुंदर स्वरूप प्राप्त होईल. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. रस्त्यांचा विकास आणि पायाभूत सुविधांची उभारणी यामुळे नागरिकांची गैरसोय कमी होऊन शहराच्या विकासाला गती मिळेल,

परीक्षेदरम्यान शाळेत अनधिकृत प्रवेशाचा प्रयत्न? निलंबित मुख्याध्यापकांविरोधात पोलिसांत तक्रार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर येथील ए.टी.यू. चाँद सुलताना हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे निलंबित मुख्याध्यापक शेख मोहम्मद समी इमाम साहब यांच्याविरोधात परीक्षा सुरू असताना शाळेत अनधिकृत प्रवेश करून गोंधळ घालण्याचा तसेच प्रशासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी अंजुमन तरक्की-ए-उर्दू ट्रस्टचे चेअरमन शेख मुशाहिद लियाकत यांनी संबंधित पोलीस प्रशासनाकडे तक्रार अर्ज दाखल करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार, संबंधित मुख्याध्यापकांना संस्थेने १४ ऑगस्ट २०२६ पासून निलंबित केले आहे. त्यांच्याविरोधात सेवा शर्तींचा भंग, बनावट जाहिरात व कागदपत्रे तयार करणे, शासनाची फसवणूक आणि आर्थिक अनियमितता यांसारखे आरोप करण्यात आले असून, या प्रकरणांची चौकशी सुरू असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या पत्राचा चुकीचा अर्थ लावून संबंधित निलंबित मुख्याध्यापक शाळेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या

पत्रामध्ये संबंधितांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याबाबत कोणताही स्पष्ट आदेश नसल्याचेही तक्रार अर्जात नमूद करण्यात आले आहे.

संस्थेने दिलेल्या निलंबन आदेशाला कोणत्याही न्यायालयाने अथवा स्कूल ट्रिब्युनलने स्थगिती दिलेली नसल्याचा दावाही तक्रारदारांनी केला आहे. सध्या शाळेत परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा पोहोचू नये, तसेच परीक्षा प्रक्रियेत कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी शाळेतील शांतता व सुव्यवस्था कायम राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर, परीक्षा कालावधीत तसेच अन्य वेळी संबंधित निलंबित मुख्याध्यापकांनी शाळेत अनधिकृत प्रवेश करून गोंधळ घालू नये, यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि त्यांना योग्य ती समज द्यावी, अशी मागणी शेख मुशाहिद लियाकत यांनी तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

भीमाशंकरमधील हजारो झाडांच्या कत्तलीच्या चौकशीसाठी रिपाइंची मागणी

अहिल्यानगर- टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने भीमाशंकर परिसरातील ३० हजार ४९० झाडांची कत्तल झाल्याच्या कथित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं), नगर शहरच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. या वेळी रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, स्वप्नील साठे, लकी वाघमारे, जमीर सय्यद, अरबाज शेख, अजीज शेख, जावेद सय्यद, शहबाज शेख, अजय बडोदे, योहान चाबुकस्वार, आयान शेख आणि राहुल ठोकळ आदी उपस्थित होते.भीमाशंकर परिसर हा जैवविविधतेने समृद्ध असून पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. येथील नैसर्गिक जंगल अनेक वन्यजीव, पक्षी, कीटक आणि विविध वनस्पतींचे अधिवास आहे. जंगलामुळे पावसाचे चक्र संतुलित राहण्यास, भूजलसाठ्याचे पुनर्भरण होण्यास, जमिनीची धूप रोखण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. अशा संवेदनशील परिसरातील मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची भीती रिपाइंच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

महापालिकेच्या एकात्मिक आरोग्य समिती चारची बैठक

अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत एकात्मिक आरोग्य समिती चारची बैठक समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच जंतनाशक दिनानिमित्त शहरातील एक ते १९ वर्षे वयोगटातील सुमारे ९० हजार विद्यार्थ्यांना जंतनाशक औषध देण्याचे नियोजन करण्यात आले. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने २७ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत जंतनाशक दिनाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत शाळांमध्ये शिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना औषध देण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांनी समन्वयाने नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले. आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, लहान वयात मुलांच्या पोटात दुखणे, स्वच्छतेचा अभाव, कुपोषण आणि रक्तक्षय यांसारख्या समस्यांमागे जंतसंसर्ग हे एक कारण असू शकते. जंतसंसर्गामुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी होऊन बालकांच्या शारीरिक वाढीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वर्षातून दोनदा जंतनाशक औषध देण्याचा उपक्रम राबविला जातो. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी या मोहिमेत जास्तीत जास्त मुलांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

जैन सोशल फेडरेशनच्या फराळ महोत्सवातून सर्वसामान्यांची दिवाळी गोड करण्याचे काम - आनंद भंडारी

नगरकरांची दिवाळी गोड करणारा फराळ महोत्सव १४ व्या वर्षात! भगवान महावीर भवनात फराळ महोत्सवाचा प्रारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सर्वसामान्यांपासून ते श्रीमंत कुटुंबांपर्यंत प्रत्येकाला दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा, या उद्देशाने जैन सोशल फेडरेशन संचलित स्टेशन रोड येथील भगवान महावीर भवन येथे सलग १४ व्या वर्षी दिवाळी फराळ महोत्सवाला प्रारंभ झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर माफक दरात, स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणात तयार केलेला दर्जेदार फराळ उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यंदाही सुरू ठेवण्यात आला आहे.

या उद्घाटनप्रसंगी बडी साजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, सतीश (बाबुशेठ) लोढा, संतोष बोथरा, डॉ. विजय भंडारी, डॉ. प्रकाश कांकरिया, सुनील मालू, आनंदऋषीजी नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, माणकचंद कटारिया, सतीश मुनोत (भोसरी), गिरीश गांधी, मिलापचंद पटवा, प्रकाश पटवा, अमित पटवा, रुपेश पटवा, आर्यन पटवा आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, भगवान महावीर भवनातील फराळ महोत्सवात

स्वच्छता आणि आरोग्याची काळजी घेऊन फराळाची निर्मिती केली जाते. दर्जेदार फराळ माफक दरात उपलब्ध करून देत सर्वसामान्यांची दिवाळी गोड करण्याचे काम पटवा परिवार करत आहे. सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात येणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, महावीर भोजनालयाच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला.

दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि आनंदाचा सण नसून माणसांना प्रेमाने जोडणारा उत्सव आहे. गेल्या १४ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेला हा महोत्सव सामाजिक जिव्हाळा, विश्वास आणि सेवाभाव जपणारा उपक्रम ठरला आहे. नफ्याच्या स्पर्धेच्या काळातही सर्वसामान्यांना दर्जेदार फराळ उपलब्ध करून देणे ही समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची भावना असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी यांसह विविध प्रकारचे दिवाळी फराळ नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नगरकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या उपक्रमाने १४ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केली असून, शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतून या फराळाला मागणी असल्याचे आयोजकांनी सांगितले.

महोत्सवाच्या प्रास्ताविकात मिलापचंद पटवा यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना घरगुती चवीचा, स्वच्छतेची काळजी घेऊन तयार केलेला स्वादिष्ट फराळ सहज उपलब्ध व्हावा, या हेतूने महोत्सवाची संकल्पना सुरू करण्यात आली. यंदा दुष्काळाचे सावट आणि कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती असतानाही नागरिकांना परवडणाऱ्या दरात फराळ मिळावा, यासाठी 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर विक्री केली जात आहे. नगरकरांकडून मिळणारे प्रेम आणि प्रतिसाद हेच या उपक्रमाच्या यशाचे खरे बळ आहे. गेल्या वर्षी सुमारे १३० टन फराळाची विक्री झाली होती. अखेरच्या टप्प्यात फराळाचा साठाही संपला होता. यंदा १४० टन फराळ विक्रीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती पटवा यांनी दिली.

संतोष बोथरा यांनी पटवा परिवाराच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. सर्वसामान्यांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने कमी दरात दर्जेदार फराळ उपलब्ध करून देण्याचे काम पटवा परिवार सातत्याने करत आहे. या कार्यात परिवाराची दुसरी पिढीही सेवाभावाने सहभागी झाली असून, घरगुती पद्धतीने तयार केलेल्या फराळाला शहरासह संपूर्ण जिल्ह्यातून मागणी मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

उच्च प्रतीचा कच्चा माल वापरून स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणात फराळ तयार करण्यात येत आहे. नगरकरांना चांगल्या दर्जाचा फराळ मिळावा यासाठी संपूर्ण टीम दिवसरात्र परिश्रम घेत आहे. नागरिकांच्या प्रेमामुळे १४ वर्षांपूर्वी सुरू झालेला हा उपक्रम यशस्वीपणे पुढे जात असल्याचे रुपेश पटवा आणि अमित पटवा यांनी सांगितले.

'एआय' मनुष्याचा डिजिटल असिस्टंट; कामकाज अधिक गतिमान करण्याची संधी!

अहिल्यानगर महापालिकेच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी व्याख्यान; लेखक व व्याख्याते विवेक मेहत्रे यांचे मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे मनुष्याचे डिजिटल असिस्टंट म्हणून काम करत आहे. एआयमुळे कामकाजातील वेळेची बचत होऊन विविध प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करता येतात. त्यामुळे या तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज दूर करून प्रत्येकाने त्याचा योग्य वापर शिकणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन लेखक व व्याख्याते विवेक मेहत्रे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 'कार्यालयीन कामकाजात एआयचा वापर' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, पुष्कर कुलकर्णी, करण कराळे, उपायुक्त मेहर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, अशोक साबळे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, तडवी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विवेक मेहत्रे म्हणाले की, देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या काळात

संगणकाचा वापर सुरू झाला, तेव्हाही कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, संगणक मानवाशी स्पर्धा करण्यासाठी आले नव्हते, तर कामकाज सुलभ व्हावे, कामे जलद गतीने पूर्ण व्हावीत आणि जगभरातील लोकांशी संपर्क साधता यावा, यासाठी त्याचा वापर सुरू झाला. एखाद्या तंत्रज्ञानाची पुरेशी माहिती नसताना त्याला विरोध करणे ही मानवी प्रवृत्ती आहे. मात्र, एआय हा आपला शत्रू नसून जीवनात आणि कामकाजात नवीन संधी उपलब्ध करून देणारे साधन आहे.

एआयबाबत अनेक गैरसमज आहेत. ते दूर करून या तंत्रज्ञानाचे फायदे समजून घेणे गरजेचे आहे. मानवानेच कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित केली असून आज एआय आपल्या घरापर्यंत, अगदी स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे. इंटरनेटचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला असून मोबाईलच्या माध्यमातूनही विविध तंत्रज्ञान सहज उपलब्ध झाले आहे. एआयचा वापर आता सहजपणे करता येत असल्याने प्रत्येकाने नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून घेऊन ते आत्मसात करणे आवश्यक आहे.

एआय ही संकल्पना १९५६ मध्ये चर्चेत आली. आज त्याचा वापर विविध क्षेत्रांत वाढत आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार स्वतःला अद्ययावत न करणाऱ्यांना रोजगाराच्या क्षेत्रात आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे तंत्रज्ञानाला रोखण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्याचा योग्य आणि जबाबदारीने वापर शिकला पाहिजे. अहिल्यानगर महानगरपालिकेने ई–ऑफिस सुरू करून तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाला गती मिळून नागरिकांना अधिक जलद सेवा देता येतील, असे मेहत्रे यांनी सांगितले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेने सर्वप्रथम मराठी भाषेत ई–ऑफिस सुरू केले. सध्या महापालिकेचे शंभर टक्के कामकाज ई–ऑफिसच्या माध्यमातून सुरू आहे. आता अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही दैनंदिन कार्यालयीन कामकाजात एआयचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या तंत्रज्ञानामुळे कामकाज अधिक जलद, सुलभ आणि कार्यक्षम होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग; ३१ ऑक्टोबरला पैठणमध्ये ध्वजारोहण!

मोक्षघाटावर १५ फुटी ध्वज फडकणार; साधू–संतांच्या उपस्थितीत धार्मिक सोहळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक पैठण नगरीत आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर धार्मिक सोहळ्यांची तयारी सुरू झाली आहे. गोदावरी नदीच्या पवित्र तीरावरील कृष्णकमळ तीर्थ आणि दौलेश्वर तीर्थावरील मोक्षघाट येथे शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात ३० फुटी उंच खांबावर १५ फुटी भव्य ध्वज सन्मानाने फडकविण्यात येणार आहे.

या धार्मिक सोहळ्यास खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे, नगराध्यक्षा विद्या कावसनकर, नगरसेवक, विविध मठांचे महंत, संत–महंत आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

पैठणच्या प्राचीन धार्मिक परंपरेला उजाळा देणाऱ्या या सोहळ्यामुळे आगामी सिंहस्थ पर्वाच्या तयारीला सुरुवात होणार आहे. या निमित्ताने देशभरातील साधू–संतांना निमंत्रित करण्यात येत असून, वारकरी आखाडा परिषद पैठणचे अध्यक्ष महंत बळीराम महाराज जोगस, नगराध्यक्षा विद्या कावसनकर, आयोजन समितीचे मुख्य संयोजक पवन लोहिया तसेच समितीचे सदस्य सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रयत्नशील आहेत.

यापूर्वी २००३ आणि २०१५ मध्ये पैठण येथे लाखो भाविकांच्या उपस्थितीत शाहीस्नान सोहळे पार पडले होते. या सोहळ्यांच्या स्मृतींना उजाळा देत यंदाच्या सिंहस्थ पर्वाच्या तयारीला प्रारंभ होत असल्याने भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. ध्वजारोहण सोहळ्याच्या माध्यमातून पैठणच्या धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित होणार आहे.

श्रीराम तांबोळी यांच्या पुढाकारातून चैतन्य संगीत साधना मंचाची 'संगीत सभा' दिमाखात

मान्यवरांचा सत्कार, विद्यार्थ्यांचा गौरव आणि सुरेल सादरीकरणाने रंगली अविस्मरणीय मैफल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– संगीत साधनेचा प्रसार आणि नवोदित कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने चैतन्य संगीत साधना मंचाचे आयोजक श्रीराम तांबोळी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेली ''संगीत सभा'' रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात श्री गणरायाला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ संगीततज्ज्ञ डेव्हिड चांदेकर, टीव्ही स्टार मोहिनीराज गटणे, ज्येष्ठ गायक नंदकुमार महाले, शैलेंद्र गांधी, अशोकराव गांधी, तर ज्ञानेश्वर दुधाडे बोपर्डीकर मॅडम तसेच ज्येष्ठ गायक व वादक सूर्यकांत पुंडे,निलीमा बंडेलु, ॲडव्होकेट शितोळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आयोजक श्रीराम तांबोळी यांनी चैतन्य संगीत साधना मंचाच्या माध्यमातून संगीताची आवड जोपासणाऱ्या साधकांना सातत्याने व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंचाचे बाळासाहेब पतंगे, सौ.अनघा मुळे,डॉ.सौ सुनीता येवतकर, सौ.श्रुती कुलकर्णी, डॉ.सौ. रुपाली कुलकर्णी, सौ.जयश्री कुटे, सौ.सुषमा वैद्य, ॲड.सौ.मनिषा देशमुख, सुनिल भंडारी, आनंद कुलकर्णी साधकांनी विविध मराठी भक्तिगीते व भावगीतांचे उत्कृष्ट सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान कलाकारांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या संगीत क्षेत्रातील मेहनत आणि कलागुणांचा गौरव करण्यात आला. उपस्थित रसिकांनी प्रत्येक सादरीकरणाला उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.साथसंगत तबला अजय पिंपळे, संवादिनी प्रणव देशपांडे तसेच तालवाद्य शंतनु पिंपळे यांनी दिली.

समारोपावेळी श्रीराम तांबोळी यांनी सर्व प्रमुख पाहुणे कलाकार विद्यार्थी संगीतप्रेमी रसिक आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या नियोजनामुळे आणि अथक परिश्रमामुळे ही संगीत सभा यशस्वी व संस्मरणीय ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे निवेदन डॉ.सौ . सुनीता येवतकर यांनी केले. शेवटी गुण गाईन आवडी संगीत सभा संपन्न झाली.

सहकार, सामाजिक कार्य आणि नेत्रसेवेत उल्लेखनीय योगदान; संत सावताश्रम शिक्षण संस्थेतर्फे मान्यवरांचा सन्मान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल विष्णू फुलसौंदर, समता परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुभाष लौढे आणि नेत्रसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल नेत्रदूत पुरस्कार प्राप्त जालिंदर बोरुडे यांचा संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रांत कार्यरत राहून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याच्या या उपक्रमातून संस्थेने सामाजिक कर्तृत्वाचा सन्मान करण्याची परंपरा जपली. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सचिव प्रा. सुनील जाधव, परेश लोखंडे, संजय पडोळे, अर्जुनराव बोरुडे, अंकुश पटवेकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक राजीव घोलप, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक राजकुमार शिंदे आदी उपस्थित होते.

सहकार क्षेत्रात महत्त्वाची जबाबदारी मिळविणारे विष्णू फुलसौंदर, सामाजिक समतेचा विचार पुढे नेण्यासाठी समता परिषदेच्या माध्यमातून कार्य करणारे सुभाष लौढे आणि नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील गरजू व्यक्तींना दृष्टी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणारे जालिंदर बोरुडे या तिघांच्या कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. सामाजिक, सहकार आणि आरोग्य क्षेत्रात काम

करणाऱ्या व्यक्तींच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याबरोबरच त्यांच्या कार्यातून समाजातील इतरांनाही प्रेरणा मिळावी, हा या सन्मानामागील प्रमुख उद्देश होता.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक बाळासाहेब बोराटे म्हणाले की, समाजामध्ये अनेक व्यक्ती आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करत असतात. मात्र, त्यांच्या कार्याची योग्य वेळी दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे. सहकार क्षेत्र असो, सामाजिक चळवळ असो किंवा आरोग्यसेवा असो, प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचे योगदान समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. अशा व्यक्तींच्या कार्याचा गौरव केल्यामुळे त्यांना अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते आणि नव्या पिढीसमोरही चांगले आदर्श निर्माण होतात.

बोराटे पुढे म्हणाले की, श्री संत सावताश्रम शिक्षण संस्था केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यापुरती मर्यादित नसून सामाजिक जाणीव, संस्कार आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांची जपणूक करण्यासाठीही प्रयत्नशील आहे. शिक्षणाचा खरा उद्देश व्यक्तीला सक्षम बनविण्याबरोबरच समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा देणे हा आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना विष्णू फुलसौंदर यांनी सहकार क्षेत्रातील जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. सहकार चळवळ ही सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीशी जोडलेली आहे. नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून ग्राहकांचा विश्वास टिकविणे, आर्थिक शिस्त जपणे आणि सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. मिळालेल्या पदाचा उपयोग सहकार क्षेत्राच्या विकासासाठी आणि सभासदांच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न राहील,

वेळेचे नियोजन, मेहनत, संयमाची आवश्यकता - डॉ. श्याम तारडे

नामांकित वैद्यकीय व अभियांत्रिकी संस्थेत विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– डॉक्टर होण्याचे अनेकांचे स्वप्न असते. केवळ बुद्धीमत्तेच्या बळावर ही स्वप्नपूर्ती होत नाही, तर त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, प्रचंड मेहनत, संयम आणि अपयशातून पुन्हा उभे राहण्याच्या ताकदीची आवश्यकता असते. आजचा हा गौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, जिद्दीचा, चिकाटीचा आणि स्वप्नपूर्तीच्या दिशेने टाकलेल्या महत्त्वपूर्ण पावलाचा आहे. नामांकित शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळविण्याचे विद्यार्थ्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले असून, सर्वांना पुढील वाटचालासाठी शुभेच्छा देतो व त्यांना अनमोल मार्गदर्शन करणाऱ्या जे. जे. ॲकॅडमीचे अभिनंदन करतो. नीटसारख्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे सोपी गोष्ट नाही. महिनोन्‌महिने केलेल्या मेहनतीचे फळ आज या विद्यार्थ्यांना मिळाले आहे, असे प्रतिपादन डॉ. श्याम तारडे यांनी केले.

जे. जे. सायन्स ॲकॅडमीच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने नीट, जेईई, एमएचटी-सीईटी या परीक्षांमध्ये यश संपादन करून नामांकित संस्थेमध्ये वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या पुढील शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी डॉ. श्याम तारडे बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्याम तारडे आणि क्लासिक व्हिल्स व सुमेश इंडस्ट्रिजचे संचालक सुनीत मुनोत, तसेच ॲकॅडमीचे संचालक डॉ. कृष्णकांत झा व योगेश जहागिरदार, प्राध्यापक, पालक, समन्वयक, कर्मचारी वृंद उपस्थित होते. डॉ. तारडे व श्री. मुनोत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा संपन्न झाला.

श्री. सुनीत मुनोत म्हणाले की, वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात सहभागी होताना मला मनापासून आनंद होत आहे. स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची मेहनत, प्राध्यापकांचे अनमोल मार्गदर्शन व पालकांचे कष्ट याची जोड मिळाल्याने ते मोठ्या प्रमाणात यश मिळवू शकले. ॲकॅडमीने अधिकाधिक चांगल्या पद्धतीने मुलांची तयारी करून घेतल्यामुळे त्यांना आयआयटी, एमएनआयटी, व्हीएनआयटीसारख्या नावाजलेल्या संस्थांमध्ये प्रवेश मिळाला. विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची नवी शिखरे पादाक्रांत करावीत. इंजिनिअरिंग क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असून, केवळ पदवी मिळविण्यावर लक्ष केंद्रीत न करता ज्ञान, कौशल्य, नाविन्यपूर्ण विचार आणि तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करण्यावर भर द्यावा. यापुढील काळात विद्यार्थ्यांना नवीनवीन संधी उपलब्ध होणार आहे. सर्वच क्षेत्रात भारताची भावी पिढी अधिक सक्षम व कर्तबगार असेल, असे ते म्हणाले.

उपस्थितांनी शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विद्यार्थी विकासासाठी ॲकॅडमीच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे, तसेच पालकांनी व येणाऱ्या बॅचेसमधील इच्छुक विद्यार्थ्यांनी यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल कौतुक करून कठोर परिश्रमामधून प्रेरणा घेतली. ॲकॅडमीच्या वतीने संचालक डॉ. कृष्णकांत झा व योगेश जहागिरदार यांनी उपस्थितांचे स्वागत करून इत्यंभूत माहिती दिली. भावी डॉक्टर्स व इंजिनिअर्सनी यावेळी मनोगत व्यक्त केले. अहिल्यानगरबरोबरच मुलुंड (मुंबई) व ठाणे येथील 'जे. जे.च्या शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचे योगदान दिले जात आहे.

नीट, जेईई व एमएचटी-सीईटी-२०२६ परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून भारतातील प्रतिष्ठित संस्थांत प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्पणाचा, सातत्यपूर्णता व चिकाटीचा सन्मान करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात शार्दूल सुरवसे (एम्स, दिल्ली), धन राजहंस (एम्स, नागपूर), मृण्मयी गिरमे (बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे), आयुष लांडे (जीडीसी, मुंबई), यश गायकवाड (टोपीवाला नायर मेडिकल कॉलेज, मुंबई), वैष्णवी तरटे (एचबीटी कुपर, मुंबई), गायत्री घुले (जीएमसी, कोल्हापूर), यथार्थ गवळी (जीएमसी, जळगाव), निवेदिता जावळे (हिरे मेडिकल कॉलेज, धुळे), सिद्धेश शिंदे (जीएमसी, अंबरनाथ), अथर्व जाधव (जीएमसी, सिंधूदुर्ग), साक्षी स्नेहील (जीएमसी, मिरज), अर्पिता मोरे (जीएमसी, लातूर), वैष्णवी धारडे (राजीव गांधी मेडिकल कॉलेज, ठाणे), रोहित रणधीर (जीएमसी, यवतमाळ) यांच्यासह विविध शासकीय व नामांकित संस्थामध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी, तसेच आयुर्वेदिक व डेंटलसाठी प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

अभियांत्रिकीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी स्वामी साळुंके (आयआयटी, पटना, सीओईपी), संकेत जाधव (एमएनआयटी, अलाहाबाद), रिशिका मंत्री (व्हीएनआयटी, नागपूर), सार्थक जाधव (व्हीएनआयटी, नागपूर), आदित्य पाटील (एसपीआयटी), दर्शन फिरोदिया (सीओईपी), दिव्यल भांड (एसपीआयटी), अथर्व नागरगोजे (पीसीआयटी), अनुष्का सांगळे, ऋतुजा लगड, साक्षी चांदणे (कमिन्स), अथर्व सानप (एसपीसीओई), सागर मुलुक(वालचंद कॉलेज), शाश्वत खत्री (डीजे संघवी) यांच्यासह विविध शासकीय व नामांकित अभियांत्रिकी संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

इसळक-निंबळक येथील विद्यालयात मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग व डिस्पोजल मशीनचे लोकार्पण

कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेसाठी उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– इसळक-निंबळक (ता. नगर) येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात कृष्णाप्रीत वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने आणि व्होगनस प्रा इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने सॅनिटरी पॅड व्हेन्डिंग मशीन व डिस्पोजल मशीनचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. तसेच शालेय मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वितरण व आरोग्य शिबीराचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या लेझीम पथकाने केले. यावेळी नवदुर्गा शक्तिरूपात सजलेल्या विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या विविध रूपांची उपस्थितांना ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॉगनास इंडिया प्रा. लि.चे प्लांट हेड शरद मगर होते. कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे संचालक प्रशांत पाटील शेळके तसेच संस्थेचे सहसचिव अविनाश कोतकर, जगताप हॉस्पिटलच्या वैद्यकीय मार्गदर्शक डॉ. नयना जगताप, सेवानिवृत्त सिव्हिल हॉस्पिटल मेट्रन छायाताई निमसे, एमआयडीसीतील उद्योजक राजेंद्र गायकवाड, कु. वृषाली अबुज, सरपंच प्रियंका लामखडे, मेजर भागवत शेळके, मेजर रावसाहेब शेळके, उद्योजक सुनील शिंदे, आरोग्य अधिकारी आकाश बोरबने आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. नयना जगताप यांनी विद्यार्थिनींना 'कळी उमलताना' या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. किशोरवयातील शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीविषयी योग्य माहिती, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि या विषयांबाबत असलेले गैरसमज दूर करण्याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. तसेच विद्यार्थिनींनी कोणताही संकोच न बाळगता आरोग्यविषयक समस्यांबाबत जागरूक राहावे, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात शरद मगर यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक गरजा, वैयक्तिक स्वच्छता आणि शिक्षणातील आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींचे भविष्य उज्ज्वल घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगत विद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

विद्यार्थिनींना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनने केलेले सहकार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य व स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक बांडे सर यांनी केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जाजगे मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीकोनाने हा उपक्रम राबविल्याबद्दल मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी आभार व्यक्त केले.

गोदरेज कॅपिटलतर्फे महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत; अहिल्यानगर आणि शिर्डी येथे व्यवसायाचा विस्तार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

GODREJ CAPITAL

अहिल्यानगर– गोदरेज इंडस्ट्रीज समूहाची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने आपली उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. कंपनीने अहिल्यानगर आणि शिर्डी येथे आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असून, याद्वारे राज्यातील टियर-२ शहरे आणि उदयोन्मुख निवासी सूक्ष्म बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याच्या आपल्या धोरणाला अधिक बळ दिले आहे.

पुणेनाशिक कॉरिडॉरमधील एक महत्त्वाचे विकासकेंद्र म्हणून अहिल्यानगरचा उदय होत आहे. या भागात प्रस्तावित असलेल्या २१३ किमी लांबीच्या द्रुतगती मार्गासह पायाभूत सुविधांच्या विकासामुळे प्रादेशिक दळणवळणात लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. अधिक सुलभ संपर्कव्यवस्था आणि वाढत्या आर्थिक घडामोडींमुळे निवासी घरांची मागणी सातत्याने वाढत आहे. विशेषतः परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांच्या शोधात असलेल्या प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांमध्ये ही मागणी दिसून येते. दरम्यान, शिर्डीमध्येही स्थानिक अर्थव्यवस्थेची स्थिरता आणि वाढत्या निवासी प्रकल्प विकासामुळे घरांची मागणी चांगली राहिली आहे. शिर्डीत सातत्याने येणारे पर्यटक आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक घडामोडी यांमुळे हे शहर एक आश्वासक निवासी सूक्ष्म बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. यामुळे या भागातील परवडणाऱ्या गृहवित्ताची मागणी वाढण्यासही हातभार लागत आहे.

या विस्ताराबाबत भाष्य करताना गोदरेज हाऊसिंग फायनान्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मेहेरनोश टाटा म्हणाले, ''महाराष्ट्रातील शहरी तसेच उदयोन्मुख केंद्रांमध्ये घरांची असलेली मजबूत मागणी लक्षात घेता हे राज्य आमच्यासाठी प्राधान्याची बाजारपेठ आहे. टियर-२ शहरांमध्ये आणि सूक्ष्म बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यामागील आमचा उद्देश प्रथमच घर खरेदी करणाऱ्या आणि स्वयंरोजगार असलेल्या ग्राहकांना घर खरेदी अधिक परवडणारी व्हावी आणि गृहवित्त सहज उपलब्ध व्हावे हा आहे. वितरण-केंद्रित दृष्टिकोन, तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कर्जजोखीम मूल्यांकन आणि ग्राहककेंद्रित उपाययोजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जबाबदार आणि सर्वसमावेशक गृहवित्त सेवा उपलब्ध करून देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.''

भारत सरकारच्या 'सर्वांसाठी घरे' या व्यापक संकल्पनेला पाठबळ देण्यासाठी गोदरेज कॅपिटल पगारदार आणि स्वयंरोजगार करणाऱ्या ग्राहकांसह प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांसाठी लवचिक परतफेड कालावधीचे परवडणारे गृहकर्ज उपलब्ध करून देते. परिसंस्थेवर आधारित धोरणाचा भाग म्हणून, उदयोन्मुख सूक्ष्म बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी कंपनी ४,००० हून अधिक स्थानिक संपर्क प्रतिनिधी, विकासक आणि वितरण भागीदारांसोबतचा सहयोग अधिक मजबूत करत आहे. त्याचबरोबर, चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस व्यवस्थापनांतर्गत मालमत्ता ११,८०० कोटी रु. पेक्षा अधिक करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.ऑगस्ट २०२६ अखेर, गोदरेज कॅपिटलची व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता ३०,००० कोटी रु. पेक्षा अधिक होती. यामध्ये गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या एकूण कर्ज पोर्टफोलिओमध्ये महाराष्ट्राचा वाटा जवळपास ३०% आहे. अहिल्यानगर आणि शिर्डी यांच्या जोडीला कंपनीने छत्रपती संभाजीनगर, अमळनेर, चाळीसगाव, जळगाव, लातूर, नागपूर, पुणे (खराडी), पंढरपूर, बदलापूर, सोलापूर आणि ठाणे यांसारख्या प्रमुख केंद्रांमध्येही आपली उपस्थिती वाढवली आहे. यावरून कंपनीच्या दीर्घकालीन विकास आराखड्यात महाराष्ट्राला असलेले धोरणात्मक महत्त्व अधोरेखित होते.

विधी शिक्षणातून गुणवत्ता कार्यक्षमता सिद्ध करून सर्वसामान्य समाजाला न्याय मिळावा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– न्यू लॉ कॉलेज आहिल्या नगर येथे २७ ऑक्टोबर रोजी प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) महेश जोशी होते. तर अध्यक्षस्थानी जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी अँड व्हि डिआठरे पाटिल होते. पाहुण्यांची ओळख प्रियांका खुळे मॅडम यांनी करून दिली

न्यायमूर्ती श्री महेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कायद्याचे शिक्षण घेऊन सामाजिक बांधिलकी बरोबर योग्य करिअर निवडण्यासाठी च्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले

तर अँड व्हि डि आठरे पाटिल. यांनी संस्थेमध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना कायमच सहकार्य केले जात असल्याचे सांगितले. प्राचार्य ए एल मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात बोलताना सांगितले की विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच महाविद्यालयात कमवा व शिका योजना सुरू असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले तर प्राध्यापक बी डी पांढरे सर

यांनी आपले मनोगतात महाविद्यालयात पुढील दिवसात संशोधन केंद्र सुरू करण्याचा मानस असल्याचे सांगितले. प्रोफेसर सुहास तोरडमल सर यांनी देखील विद्यार्थी हिताचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी देखील महाविद्यालयातील उपलब्ध सोयी सुविधा वर आपले मनोगते. व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्राध्यापक डॉ रामेश्वर दुसंगे सर यांनी केले. यावेळी प्राध्यापक जी ए हिरडे. प्राध्यापक जे एम शेख मॅडम प्राध्यापक व्ही ई शिंदे सर .प्राध्यापक डी बी मोरे सर. डॉ प्राध्यापक व्ही बी शिरसाट मॅडम. ए एस बारगळ मॅडम.महेश केदार सर व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

(पान १ वरून)

तोफखाना पोलिसांनी उघडकीस आणलेल्या ड्रग्ज प्रकरणातील २३ आरोपींचे जामीन फेटाळले

दिनांक २० जुलै २०२६ रोजी तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एमडी ड्रग्जची विक्री करण्याच्या उद्देशाने आणि दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला रबरी मुखवटे, शस्त्रे आणि ड्रग्जसह रंगेहाथ पकडण्यात आले होते. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात एनडीपीएस व भारतीय शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्राथमिक तपासात ७ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप दरवडे व त्यांच्या विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि फॉरवर्ड-बॅकवर्ड लिंकचा सखोल तपास केला. या तपासात ड्रग्ज रॅकेटची व्याप्ती मोठी असल्याचे उघड झाले असून एकूण ५६ आरोपी निष्पन्न झाले आहेत. पोलिसांनी आतापर्यंत २३ आरोपींना अटक केली असून, त्यांनी न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, गुन्ह्याचे तपासी अंमलदार संदीप दरवडे यांनी न्यायालयात स्वतः हजर राहून सबळ पुराव्यांनिशी युक्तिवाद केल्याने न्यायालयाने सर्व २३ आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले आहेत. उर्वरित फरार आरोपींचा शोध सुरू असून, त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

जामीन फेटाळलेले २३ आरोपी (सध्या कोठडीत)

७. मोहंमद उर्फ कासिफ सज्जाद खान (वय २६, रा. वसीम ज्वेलर्स जवळ, मुकुंदनगर) ८. परवेज उर्फ अप्पु खड्डा असदअली सय्यद (वय ३१, रा. शहा कॉलणी, गोंविंदपुरा) ९. शाहिद शकील शेख (वय २३, रा. सय्यदनगर, महंमदवाडी रोड,हडपसर, पुणे) १०. साद इक्बाल इनामदार (शेख) (वय २६, रा. केदारी पेट्रोल पंपाजवळ, परमार गार्डन सोसायटी, वानवडी, पुणे) ११. दिनेश तुषार यादव (वय २३, रा. इस्कॉन मंदीर जवळ, कादंबरीनगरी, सावेडी) १२. कामरान कलीम शेख (वय २६, रा. शुक्रवार बाजार, लकी चिकनशॉप जवळ, भिंगार कॅम्प) १३. अशरफ (अश्रफ) ऊर्फ हाजी नदीम शेख (वय २३, रा. दिपाली टॉकीज समोर, झेंडीगेट) १४. अरशान रशीद सय्यद उर्फ मामा (वय २९, रा. दबरा हजारी दर्गा, फकिरवाडा) १५. शाहरुख उर्फ पार्टी असलम शेख (वय ३१, रा. आयेशा मशिदीजवळ, गोविंदपुरा, मुकुंदनगर) १६. अझहर वाहीदअली सय्यद (वय ३५, रा. चाँद टेलर जवळ, वेल्जी हाईटस, झेंडीगेट) १७. अनिकेत राहुल गायकवाड (वय २७, रा. तरवडे वस्ती, महंमदवाडी रोड, हडपसर ता.हवेली जि.पुणे) १८. झुल्करनेन अमनउल्लाशाहीद सय्यद (वय २१, रा. ख्रिस्तगल्ली, कैलास उडपी समोर) १९. विजय उर्फ घाज्या अनिल बोर्डे (वय २६, रा. वसीम ज्वेलर्स जवळ, मुकुंदनगर) २०. साजिद ताहेर शेख ऊर्फ मुंबई (वय २८, रा. कोठला मस्तानशहा चौक, ह.रा.आलमगीर) २१. आफताब ऊर्फ तौफिक राजु पठाण (वय २५, रा. रामगड, बेलापुर, ता.श्रीरामपूर) २२. अमिन शौकत शेख (वय २८, रा. आश्रमशाळे जवळ, टाकळीकाझी, ता.नगर) २३. नीलेश दीपक जाधव (वय ३२, रा. लक्ष्मीनगर, शिर्डी, ता. राहाता)

हवे असलेले ३३ फरार आरोपी

(रा. गोविंदपुरा) ९. गोरख परशुराम मापारी (रा. राळेगणसिद्धी ता.पारनेर) १०. रोहन किशोर कुलट (रा. डौले हॉस्पीटलजवळ सावेडी) ११. अली उर्फ बॉक्सर शकीर सय्यद (रा. मेहराज मशिदीजवळ, मुकुंदनगर) १२. सौरभ उर्फ गुड्डु पोटघन (रा. सुपा ता.पारनेर) १३. अकिब अन्सार कुरेशी (रा. हातमपुरा) १४. प्रसाद पवार (रा. सुपा ता. पारनेर) १५. दानिश उर्फ बावा इसाक शेख उर्फ जहागिरदार (रा. कराचीवाला नगर) १६. सुफियान सलीम शेख (रा. निडा प्लेस, संजयनगर, मुंबई) १७. असद जुबेर सय्यद (रा. नाज मटन शॉप, इनाम मशिदीसमोर, मुकुंदनगर) १८. अरफत मुस्ताक शेख (रा. बडी मशिदी मागे, मुल्ला कॉलनी मुकुंदनगर) १९. फैजान उर्फ लाला सय्यद (रा. नगरी चहा गल्ली, मुकुंदनगर) २०. साहिल फिरोज खान उर्फ भाऊ (रा. विखे पाटील गल्ली, मुकुंदनगर) २१. खालीद कादीर खान (रा. गोविंदपुरा, फकीरवाडा) २२. फराज जीया सय्यद (रा. झेंडीगेट) २३. फराज शहानवाज खान उर्फ बेबो (रा. बॉम्बे बेकरी जवळ) २४. जयद उर्फ टायप्या रशीद सय्यद (रा. इनाम मशिदी मागे, मुल्ला कॉलनी, मुकुंदनगर) २५. असनेन मुनाफ शेख (रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर) २६. सलमान मुस्ताक शेख उर्फ मुंबई (रा. हातमपुरा) २७. अनस रिजवान खान उर्फ तांबटकर (रा. घासगल्ली) २८. कैफ सादीक सय्यद (रा. फकीरवाडा) २९. मुस्तफा शेख उर्फ स्मार्ट अक्की (रा. मुकुंदनगर पाणी टाकीजवळ) ३०. फिरदोस फारुख पठाण (रा. शेवगाव) ३१. राहील फारुख शेख (कापडवाला) (रा. आयशा मशिदीजवळ, गोविंदपुरा) ३२. तालीब रिजवान सय्यद (रा. इनाम मशिदीजवळ, मकुंदनगर) ३३. अफरोज (रा. मीरा रोड, मुंबई - पुर्ण नाव माहिती नाही)

५० लाख द्या, अन्यथा एमपीडीए, मोक्का लावून जेलमध्ये टाकू!

न्यायालयाचा आदेश असतानाही नगर तालुका पोलीस स्टेशन आदेशाचा अवमान करतात. **पीएसआय पतंगे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी होणार का?** या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासणे, कथित आर्थिक मागणीच्या आरोपांची सत्यता पडताळणे आणि धमकी दिल्याच्या दाव्याची चौकशी करणे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ तक्रारीची नोंद घेण्यापुरते मर्यादित न राहता, आरोपांमागील वस्तुस्थिती समोर आणून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, व बोगस कारवाई झाल्यास पोलीस स्टेशन युवा पोलीस अधीक्षक कार्यालयात आत्मदहन करणार असल्याचे शरद पवार यांनी निवेदनात व पत्रकार परिषदेत सांगितले आहे . आता जिल्हा पोलीस अधीक्षक या गंभीर आरोपांची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याचे निर्देश देतात का,याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, हे सर्व आरोप शरद पवार यांनी निवेदनातून व पत्रकार परिषदेमधून केलेले आहेत.

फिर्यादीच निघाला गुन्ह्याचा मास्टरमाईंड!

शोध पथकाने तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाला गती दिली. पोलिसांनी संशयित आरीफ जाबीर खान (वय ३०) आणि शोएब चाँद रोख (वय २९, रा. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता, खुद्द फिर्यादी मजहर शेख याच्याच सांगण्यावरून हा लुटीचा बनाव रचल्याची धक्कादायक कबुली त्यांनी दिली.

या माहितीनंतर पोलिसांनी फिर्यादीसह तिघांनाही अटक केली. त्यांच्याकडून लुटलेली ३ लाख ४१ हजारांची रोख रक्कम, २० हजारांचा मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली १० लाख रुपये किमतीची अर्टिगा कार (एमएच १६ एटी ४८३५) असा एकूण १३ लाख ६१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि सपोनि सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर पोलिंनी केलेल्या यावेगवान कामगिरीचे कौतुक होत आहे. पुढील तपास सफौ पोपट रोकडे करत आहेत.

संगमनेरमध्ये कत्तलीसाठी डांबलेल्या २५ गोवंशीय जनावरांची सुटका

तेथे लहान-मोठ्या गायी, गोऱ्हे व कालवडी अशी २५ जनावरे आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून नदीम रेहमान कुरेशी (वय ३९) आणि राजमोहम्मद आरिफ सय्यद (वय ४०, दोघे रा. मदीनानगर, संगमनेर) यांना ताब्यात घेतले. चौकशीत ही जनावरे लाला कुरेशी, जहीर कुरेशी व शमसू कुरेशी (तिघेही फरार) यांच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

या पथकाने केली कारवाई

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्यासह पोलीस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, अभिजीत अरकल, रणजीत जाधव, अमृत आढाव, सतीष भवर, विशाल तनपुरे व योगेश कर्डीले यांच्या पथकाने ही कारवाई केली.